प्रकरण पहिले

# मल्लिनाथ जीवन, चरित्र काळ व ग्रंथसंपदा

# प्रकरण १ ले

# मल्लिनाथ जीवन, चरित्र काळ व ग्रंथसंपदा

## १.० प्रास्ताविक :

कविकलगुरु कालिदासाच्या वाङ्मयावर टीका करणाऱ्या संस्कृत टीकाकारांमध्ये "कोलाचल मल्लिनाथ सूरी" हे नाव सर्वात वरचे आहे. परंतु कालिदासाप्रमाणेच त्याच्याविषयी विद्वानांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. याचे कारण असे की, मल्लिनाथ नावाच्या अनेक व्यक्ती आढळतात. त्यातील कोलाचल मल्लिनाथ हा मेघदूताचा टीकाकार मानला जातो.

काव्यप्रकाशाचा टीकाकार सरस्वतीतीर्थ यांच्याही वडिलांचे नाव मल्लिनाथ होते. ते सोमयाजी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी रघुवंशादी महाकाव्यांवर टीका लिहिल्या आहेत. त्यांचा जन्म इ. स. १२४२ मध्ये झाला आहे.[१] यावरुन हे मल्लिनाथ बाराव्या शतकाच्या शेवटी व तेराव्या शतकाच्या प्रारंभी झाले असावेत.

अमरकोशाचे टीकाकार म्हणूनही एक मल्लिनाथ आहेत. त्यांनी 'अमरपदपारिजात' नामक टीका लिहिली आहे.[२] हे वत्स गोत्रातील असून नृसिंहसूरीचे पुत्र आहेत. कदाचित हे काव्यप्रकाशचे टीकाकार सरस्वतीतीर्थ (नरहरी) यांचे वडील असावेत.[३] डॉ. सुरेशचंद्र बॅनर्जी यांच्या मते काव्यप्रकाशचा टीकाकार व अमरकोशाचा टीकाकार हे वेगवेगळे मल्लिनाथ आहेत.[४] परंतु हे दोन्ही मल्लिनाथ एकच व्यक्ती आहेत असे लक्षात येते.

दंडीच्या 'काव्यादर्श' या ग्रंथावरील 'वैमल्यविधायिनी' नामक टीकेचा कर्ता मल्लिनाथच आहे. त्याच्या पित्याचे नाव जगन्नाथ होते. त्यांनी या टीकेच्या पुष्पिकेत स्वतःचा उल्लेख 'भट्टमल्लिनाथ' असा केला आहे. विश्वेश्वर पंडित यांनी आपल्या 'अलंकार-कौस्तुभ' ग्रंथात याच मल्लिनाथाचा उल्लेख केला आहे. हा मल्लिनाथ सुद्धा कोलाचलमल्लिनाथाहून पूर्णतः भिन्न आहे.[५] 'प्राकृत-व्याकरण वृत्ति' या ग्रंथाचे कर्ते त्रिविक्रम यांच्या पित्याचे नाव सुद्धा मल्लिनाथ होते. हे मल्लिनाथ, आदित्यवर्माचा पुत्र होते.

वैद्यकशास्त्रावरील 'वैद्यकल्पतरु' नामक ग्रंथाचे लेखकही मल्लिनाथ आहेत. 'पथ्यापथ्यनिरुपण' नामक आणखी एक ग्रंथ उपलब्ध आहे. त्याचा कर्ताही मल्लिनाथच आहे. या ग्रंथाचा लेखन काळ शके १६४४ हा आहे.

दक्षिणेकडील राजनारायण नामक एका राजाने स्वत: 'मल्लिनाथ' नामक उपाधी धारण केली होती. ते इ. स. १३३९ ने १३६३ च्या दरम्यान होऊन गेले. या संबंधीची उपलब्ध माहिती पुढील परिच्छेदातून दिली आहे.

"Rajanarayana Sambuvaraya, Sengeni Chieftains (1339-1363 A.D.)

Besides this title of Rajagambira, Rajanarayana is mentioned with three other surnames, such as Mallinathan, Udaragunaraman and Ponninthambrian."[6]

"An inscription from Kanagayanallur dated 10th May, 1354, registers a sale of land for 170 virachampan kuligai by one Tiruvenkatamudaiya to the sabha of kangayanallur alias Mallinatha Chaturvedimangalam since Mallinatha was one of the surnames assumed by Rajanarayana, it is probable that he founded a Brahmin colony at the village and called it by the above name."[7]

डॉ. के. ए. नीलकण्ठ शास्त्री यांनी आपल्या ग्रंथात दोन ठिकाणी मल्लिनाथाचे उल्लेख केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

"Early in 1367, a battle was fought at Kauthal, South of Tungabhandra. The Muslims gained the victory, thanks to their gun and their cavalry, the Hindu artillery not comming in to play till it was to late and their Commander Mallinatha being martially wounded."[8]

"Two commentatries were written on Tarkabhasa, one by Famous Mallinatha, (thirteenth century)."[9]

त्यांनी दोन्ही मल्लिनाथ एकच असल्याचे नमूद केले आहे.

श्री. एन्. वेंकटरामय्या यांनी मल्लिनाथाविषयी असे म्हटले आहे की,

"In addition to these, several explicit references to the conquest of the Hoyasala Kingdom are met with in the incriptions of the time of Bukka - I. Mallinatha Vodeya, son of Aliya sayi Nayaka, one of the officers of Bukka-I secured victories over the Hoyasala army."[10]

इथे एक गोष्ट दिसून येते की, श्री. वेंकटरामनय्या व श्री. नीलकंठशास्त्री यांच्या मतानुसार बुक्क पहिला याचे सहाय्यक असणारे दोन्ही मल्लिनाथ एकच आहेत. शास्त्रींनी उल्लेख केलेले

तर्कभाषेचे टीकाकार मल्लिनाथ दुसरेच असावेत कारण ते तेराव्या शतकातील असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

श्री. वेंकटरामनय्याने उल्लेखिलेले सेनानायक मल्लिनाथ वोदेय यांच्या वडिलांचे नाव अलिय सायी नायक आहे. याशिवाय त्यांनी कोलाचल मल्लिनाथ सूरीच्या बाबतीत असे म्हटले आहे की–

"Vaisyavamsasudharnava was written by Mallinatha by the order of praudha Devaraya. This is Devaraya II, who ruled at vijayanagara I423-I447. This however is doubtful as Devaraya I is also reffered to by this name in some of his inscriptions.

Now which of these two was the praudha Devaraya who commanded Mallinath to write the Viasyavamsasudharnava ? We can decide it only by discovering the date of Mallinatha."

"Peddibhatta, who was bathed in a shower of gold by Sarvajna, should have been his contemporary. In that case Mallinatha II, who was the father of pedlibhatta, must have belonged to the generation before I420. The king, who then ruled at Vijayanagara was Devaraya I and not Devaraya II. Therefore it should have been at the instance of Devaraya I, that Mallinatha composed his vaisyavamsasudharnava."[11]

बल्लाळसेनाने आपल्या भोजप्रबंध या ग्रंथात तीन ठिकाणी मल्लिनाथाचा उल्लेख केला आहे. तो पुढीलप्रमाणे –

१ – ''ततः कदाचिन्मृगयापरिश्रान्तो राजा क्वचित्सहकारतरोरधस्तात्तिष्ठति स्म। तत्र मल्लिनाथाख्यः कविरागत्य प्राह –

शाखाशतशतवितताः सन्ति कियन्तो न कानने तरवः।
परिमलभरमिलदलिकुलदलितदलाः शाखिनो विरला।।
ततो राजा तस्मै हस्तवलयं ददौ।''[१२]

२ – ''एकदा सिंहासनमलङ्कुर्वाणे श्रीभोजे सकलभूपशिरोमणी द्वारपाल आगत्य प्राह – 'देव दक्षिणदेशात्कोऽपि मल्लिनाथनामा कविः कौपीनावशेषो द्वारि वर्तते।' राजा – 'प्रवेशय' इत्याह। ततः कविरागत्य 'स्वस्ति' इत्युक्त्वा तदाज्ञया चोपविष्टः पठति –

नागो भाति मदेन खं जलधरैः पूर्णेन्दुना शर्वरी
शीलेन प्रमदा जवेन तुरगो नित्योत्सवैर्मन्दिरम्।
वाणी व्याकरणेन हंसमिथुनैर्नद्यः सभा पण्डितैः
सत्यपुत्रेण कुलं त्वया वसुमती लोकत्रयं भानुना।।

ततो राजा प्राह – 'विद्वन्, तवोद्देश्यं किम्' इति। ततः कविराह –

'अम्बा कुप्यति न मया न स्नुषया सापि नाम्बया न मया।
अहमपि न तया नतया वद राजन्कस्य दोषोऽयम्।।'इति।

राज च दारिद्र्यदोषं ज्ञात्वा कविं पूर्णमनोरथं चक्रे।''[१३]

३ – ''ततः कदाचित्सिंहासनमलंकुर्वाणे श्रीभोजे कालिदास–भवभूति–दण्डि–बाण–मयूर–वररुचिप्रभृतिकविकुलालङ्कृतायां सभायां द्वारपाल एत्याह– 'देव कश्चित्कविर्द्वारि तिष्ठति। तेनेयं प्रेषिता गाथासनाथा चीठिका देवसभायां निक्षिप्यताम्' इति तां दर्शयति। राजा गृहीत्वा तां वाचयति–

'काचिद्बाला रमणवसतिं प्रेषयन्ती करण्डं
दासीहस्तात्सभयमलिखद्व्यालमस्योपरिस्थम्।
गौरीकान्तं पवनतनयं चम्पकं चात्र भावं
पृच्छत्यार्यो निपुणतिलको मल्लिनाथः कवीन्द्रः।।

तच्छ्रुत्वा सर्वापि विद्वत्परिषच्चमत्कृता। ततः कालिदास प्राह – 'राजन् मल्लिनाथः शीघ्रमाकारयितव्यः' इति। ततो राजादशाद्द्वारपालेन स प्रवेशितः कविः राजानं 'स्वस्ति' इत्युक्त्वा तदाज्ञयोपविष्टः। ततो राजा प्राह तं कवीन्द्रम् – 'विद्वन्मल्लिनाथ कवे, साधु रचिता गाथा।' तदा कालिदासः प्राह – 'किमुच्यते साध्विति। देशान्तरगतकान्तायाश्चारित्र्यवर्णनेन श्लाघनीयोऽसि। विशिष्य तत्तभ्दावप्रतिभटवर्णनेन।' तदा भवभूतिः प्राह – 'विशिष्यत इयं गाथा पंक्तिकण्ठोद्यानवैरिणो वातात्मजस्य वर्णनात्'इति। ततः प्रीतेन राज्ञा तस्मै दत्तं सुवर्णानां लक्षम्। पञ्च गजाश्च दश तुरगाश्च दत्ताः। ततःप्रीतो विद्वान्स्तौति राजानम् –

'देव भोज तव दानजलौघैः सोऽयमद्य रजनीति विशङ्के।
अन्यथा तदुदितेषु शिलागोभूरुहेषु कथमीदृशं दानम्।।

ततो लोकोत्तरं श्लोकं श्रुत्वा राजा पुनरपि तस्मै लक्षत्रयं ददौ। ततो लिखित स्म भाण्डारिको धर्मपत्रे –

प्रीत: श्रीभोजभूप: सदसि विरहिणो गूढनर्मोक्तिपद्यं
श्रुत्वा हेम्नां चं लक्षं दश वरतुरगान्पञ्च नागानयच्छत्।
पश्चात्तत्रैव सोऽयं वितरणगुणसद्वर्णनात्प्रीतचेता
लक्षं लक्षं च लक्षं पुनरपि च ददौ मल्लिनाथाय तस्मै।[१४]

वरील परिच्छेदातून असे दिसून येते की, बल्लाळसेनाने उल्लेखिलेले तीनही मल्लिनाथ निपुण कवी असावेत. आणि बल्लळसेन यापैकी तीन किंवा एका मल्लिनाथाशी परिचित असावेत. बल्लाळसेन यांचा काळ इ. स. चे सोळावे शतक आहे.[१५]

कोलाचल मल्लिनाथ सूरी या नावातील 'सूरि' या नावाचा थोडा विचार करू. श्री. वामन शिवराम आपटे यांनी 'सूरि' या शब्दाचा अर्थ 'जैन आचार्यांना दिलेले सन्मानदर्शक पद' असा दिला आहे. त्यांनी उदाहरण म्हणून 'मल्लिनाथ सूरि' हे दिले आहे.[१६] परंतु कोलाचल मल्लिनाथ सूरींनी आपल्या टीकांमध्ये प्रारंभी गणेश, शिव, सरस्वती, राम व कृष्ण यांची स्तुती केली आहे. त्यामुळे ते जैन मतावलंबी होते असे म्हणता येत नाही.

'सूरि' या शब्दाचा अर्थ कोशांमध्ये 'विद्वान' या आर्थी आढळतो.[१७] त्यावरून त्याच अर्थाने टीकाकार मल्लिनाथाच्या नावापुढे 'सूरि' हे पद लावलेले आहे.[१८]

## १.१ मल्लिनाथाचे जीवन चरित्र :-

कोलाचल मल्लिनाथांनी स्वत:च्या कुटुंबियांबाबत आपल्या ग्रंथात काहीही लिहिले नाही. मात्र ते 'कोलाचल' कुटुंबातील होते आणि 'महामहोपाध्याय' ही पदवी ते धारण करीत होते. विद्यानाथाच्या 'प्रतापरुद्रीय' या अलंकाशास्त्रीय ग्रंथावरील टीकेचा कर्ता कुमारस्वामी स्वत:ला 'मल्लिनाथसुत' म्हणतात. त्यांनी केलेल्या उल्लेखावरून असे दिसून येते की, मल्लिनाथाला दोन पुत्र होते. त्यातील कनिष्ठाचे नाव कुमारस्वामी होते तर त्याच्या ज्येष्ठ बंधूचे नाव पेद्दुचार्य होते.[१९]

चंपूरामायणाच्या 'पदयोजना' नामक टीकेच्या प्रस्तावनेमध्ये 'नारायण' कवीने स्वत:चा वंश परिचय दिला आहे.[२०] हा परिचय, टीकाकार मल्लिनाथाचे आजोबा मल्लिनाथ यांच्यापासून सुरू होऊन 'पदयोजना' टीकेचा कर्ता नारायण पर्यंत अकरा पिढींचा आहे. याप्रमाणे संजीवनी टीकाकार मल्लिनाथांच्या आजोबांचे नाव सुद्धा मल्लिनाथच होते आणि त्यांच्या वडिलांचे नाव कपर्दी होते. नारायण कवीने दिलेली वंशपरंपरा पुढीलप्रमाणे आहे.[२१]

मल्लिनाथ (कोलचलम् वंश)

- कपर्दी (श्रौतकारिकावृत्तिकर्ता)
  - मल्लिनाथ
  - पेद्दुभट्ट
    ज्योतिषकर्ता, नैषधव्याख्याता।
    - कुमारस्वामी ( रत्नापणकर्ता)
      - महादेव (दुसरे ही तीन)
        - शंभू
          - भास्कर
            - नागेश्वर
              - कौण्डुभट्ट (द्वितीय पुत्र)
                - नागेश्वर (पत्नी नरसक्का)
                  - नारायण (पदयोजनाकर्ता।

कुमारस्वामी व नारायण यांनी दिलेल्या वंशावळीत विरोध आहे. कुमारस्वामी यांच्या मतानुसार ते मल्लिनाथाचे पुत्र असून नारायण यांच्या मतानुसार मल्लिनाथाचे बंधू पेद्दुभट्ट यांचे पुत्र आहेत. शिवाय नारायण हा कुमारस्वामीच्या आठव्या पिढीत जन्मला आहे हे मत स्वीकार्य वाटत नाही.

नृसिंह यांनी रचलेल्या 'स्वरमनोज्ञमञ्जरी' वर 'परिमल' नावाच्या टीकेचा कर्ता गिरिनाथ स्वत:ला कोलाचल मल्लिनाथाचा पुत्र सांगतात. त्यांनी मल्लिनाथाच्या तीन पुत्रांसह त्यांची वंशपरंपरा पुढीलप्रमाणे सांगितली आहे.[२२]

मल्लिनाथ (प्रथम)

|

कपर्दी

|

मल्लिनाथ (द्वितीय)

|

| | | |
|---|---|---|
| पेद्दयार्य | कुमारस्वामी | गिरिनाथ |
| किंवा पेदुभट्ट | महादेव | |
| किंवा पेद्दिभट्ट | इत्यादि | |

परंतु डॉ. वी. राघवन् गिरिनाथालाच पेद्दुभट्ट मानतात.[२३] कदाचित मल्लिनाथ आणि गिरिनाथ किंवा पेद्दयार्य यांनी मिळून 'स्वरमनोज्ञमञ्जरी' ची टीका लिहिली असावी. काही वर्षांपूर्वी प्राप्त झालेल्या मेघदूताच्या हस्तलिखित प्रतीच्या टीकेचे नाव 'पञ्जरिका' आहे. याच्या कर्त्याने स्वत:साठी 'मल्लिनाथसुत' लिहिले आहे. परंतु त्याने आपले खरे नाव दिले नाही. डॉ.रामेश्वर प्रसादांनी संपादित केलेल्या या टीकेची सुरूवातीची ओळ अशी आहे –

''अथ श्रीमल्लिनाथसुतविरचिता पञ्जरिका टीका।''[२४] तसेच या टीकेच्या शेवटच्या पुष्पिकेतील पहिली ओळ अशाप्रकारे आहे – ''इति श्रीमल्लिनाथसुतविरचिता मेघदूताख्या पञ्जरिका समाप्ता।'' याशिवाय टीकेत इतरत्र कोठेही पञ्जरिकाकाराने आपल्या वंशाविषयी किंवा स्वत:विषयी कसलाच उल्लेख केलेला नाही. प्राप्त झालेल्या मूळ हस्तलिखिताचा काळ शक संवत १५३० आहे.[२५] यावरून पञ्जरिकाकाराचा काळ त्या पूर्वीचा सिद्ध होतो. डॉ. रामेश्वर प्रसाद मिश्रांनी मल्लिनाथ प्रथम यांचा पुत्र कपर्दी व 'मल्लिनाथसुत' हे दोघेही एकच आहेत अशी शक्यता सांगितली परंतु कोणत्याही निश्चयापर्यंत पोहोचले नाहीत.[२६] त्यांनी ज्या आधारावर हे सांगितले त्याविषयी शंका आहे. पं. बलदेव उपाध्याय यांनी 'सायण आणि माधव' या ग्रंथात कपर्दीकृत 'श्रौतकारिकावृत्ति' च्या प्रस्तावनेत ज्या दोन श्लोकांना उद्धृत केले आहे ते नारायणाच्या 'पदयोजना' टीकेतील सुरुवातीचे श्लोक आहेत.[२७] अशाप्रकारे डॉ. मिश्र कपर्दीपर्यंत पोहचतात आणि कपर्दिसुत (जे आपले टीकाकार) मल्लिनाथाचे पुत्र कुमारस्वामीकडे लक्ष देत नाहीत. कुमारस्वामीच्या टीकेवरून हे स्पष्टपणे लक्षात येते की, पञ्जरिका त्यांची कृती नाही कारण त्यांनी रत्नापणप्रमाणे त्यातही आपल्या वंशाचा परिचय करून दिला असता आणि स्वत:च्या प्रतिज्ञेनुसार पित्याच्या टीका पद्धतीचे अनुसरण केले असते.

डॉ. अमरनाथ पाण्डेय यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, "पञ्जरिकाकार मल्लिनाथसुत हे दुसरेच कोणीतरी असून कोलाचल मल्लिनाथ सूरीच्या वंशाहून वेगळे आहेत."

दक्षिण भारतात प्रसिद्ध महाकाव्यांचा टीकाकर्ता या स्वरुपात पेद्दुभट्ट यांचे नाव सुरुवातीपासूनच आढळते. 'कृष्णकर्णामृत' काव्याचे टीकाकार पपयल्लसूरि यांनी आपल्या टीकेत एका श्लोकाद्वारे[२८] या पेद्दुभट्टाच्या यशाप्रमाणे यश प्राप्त करण्याची इच्छा न करता सदैव कृष्ण स्मरणाची इच्छा व्यक्त केली आहे. यावरून वर सांगितलेल्या तथ्याची पुष्टी मिळते.

याशिवाय आणखी एक तथ्य समोर येते की टीकाकार मल्लिनाथांनाच सुरुवातील पेद्दुभट्ट म्हटले जात होते. त्यांच्या विषयी अनेक कथा प्रचलित आहेत. कन्नड भाषेतील 'कथा-संग्रह' या ग्रंथात सुद्धा अशीच एक कथा येते.  के. पी. त्रिवेदी यांनी संपादित केलेल्या 'एकावली'च्या प्रस्तावनेत 'पेद्दुभट्टरचितम्'[२९] च्या आधावर दिलेली माहिती खालीलप्रमाणे आहे -

मल्लिनाथालाच पेद्दुभट्ट सुद्धा म्हटले जाते. काही तेलगू आणि कन्नड भाषा क्षेत्रांमध्ये ते याच उपनावाने ओळखले जात होते. या दोन्ही भाषेत 'पेद्दुभट्ट' याचा अर्थ मूर्ख असा होतो. याप्रकारे मल्लिनाथाच्या सुरुवातीच्या जीवनावर थोडाफार प्रकाश पडतो. त्यांनी आपले अध्ययन जवळजवळ तीस वर्षानंतर सुरु केले. त्यांनी काशी येथे जावून संस्कृत वाङ्मयातील सर्व क्षेत्रातील विशिष्ट ज्ञान प्राप्त केले तेव्हा त्यांना त्यांच्या अध्यापकांनी 'भट्ट' या उपाधीने सन्मानित केले. आज सुद्धा म्हैसूर तसेच त्याजवळील प्रांतात हे 'भट्ट'याच नावाने ओळखले जातात.

असे सांगितले जाते की, लहानपणी यांना शिक्षण देताना त्यांच्या वडिलांचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले. यानंतर त्यांचा विवाह झाला आणि वडीलांच्या आज्ञेनुसार ते आपल्या सासुरवाडीत राहू लागले. जेव्हा यांना कोणी, काही विचारीत तेव्हा ते मौन व्रतच धारण करीत. खूप आग्रह झाल्यावर ते म्हणायचे की, काय ग्रंथ पूर्ण आहे ? तेव्हा त्यांच्या हातात कोरे पुस्तक दिले जात होते. या अपमानाला कंटाळून, पत्नीच्या विनंतीवरून ते अध्ययनासाठी तेथूनच काशी येथे गेले. तेथे प्रयत्नपूर्वक संस्कृत शास्त्रांचे ज्ञान प्राप्त केले आणि गुर्वाज्ञेनुसार पुन्हा आपल्या सासुरवाडीत आले आणि आपल्या मेव्हण्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देवून सर्वांना आश्चर्यचकित केले. अशा प्रकारची एक दंतकथा त्यांच्याविषयी प्रचलित आहे.

सत्य काहीही असो पण सध्या ज्या रूपात आपण मल्लिनाथांना पाहतो त्यावरून स्पष्ट होते की आपल्या वंशाच्या गौरवपूर्ण परंपरेनुसार ते सुद्धा उच्चकोटीचे विद्वान होते.

## १.२ जन्मस्थान तसेच निवास :-

मल्लिनाथाच्या नावापूर्वी लागलेले 'कोलाचल' हे पद त्यांच्या कौटुंबिक परिवाराचे सूचक आहे. आंध्र परंपरेनुसार मल्लिनाथाच्या नावापूर्वी लागलेले 'कोलाचल' हे पद त्यांच्या कुटुंबाचे मूळ स्थान दर्शविते. या गावाचे ठिकान नक्की कोणते ? हे शोधण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. काही विद्वानांनी 'कोलाचल' हे 'पण्डिपादु'चे संस्कृत रूप मानले आहे. 'पण्डि' याचा अर्थ तेलगु भाषेत डुक्कर (शूकर) असा होतो. आणि 'पादु' हा ठिकाणांच्या नावाच्या शेवटी लागणारा प्रत्यय आहे. अशाप्रकारे आपल्या नावापूर्वी 'कोलिचिन' किंवा 'कोलचन' हे पद धारण करणाऱ्यांनी मल्लिनाथाला आपल्या कौटुंबिक परंपरांशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. या कुटूंबाच्या सुरुवातीच्या इतिहासावरुन असे लक्षात येते की, हा वंश पूर्वी 'वारङ्गल' किंवा 'राककोण्डा'च्या राजदरबाराशी संबधित आहे. तेलंगाना मध्ये 'कोलाचलमपुरी' नावाचे एक गाव आहे ज्याचा उल्लेख 'वेलुगोतिवरिवंशावली' मध्ये आला आहे. कदाचित या परिवाराचे मूळ स्थान हेच गाव असावे अशी शक्यता जास्त आहे.[३०]

एस्. वैद्यनाथ शास्त्रींनी श्री. के. पी. त्रिवेदी यांना सांगितले होते की, कोलाचलम वेंकटराव आणि कोलाचलम श्रीनिवास हे दोघेही भाऊ आहेत. ज्यांना मल्लिनाथाच्या वर्तमानातील वंशज म्हटले जाते. कोलाचलम् वेंकटराव हे काडप्पा येथील जिल्हा न्यायालयात वकीली करीत होते. त्यांना श्री. के. पी. त्रिवेदींनी एक पत्र पाठविले. त्याचे उत्तर देण्यासाठी त्यांनी जे पत्र पाठविले त्या पत्रात त्यांचे पूर्वज जे मल्लिनाथ त्यांच्या अधिक माहिती विषयी अनभिज्ञता दाखवून लिहिले की, 'मल्लिनाथ' भगवान 'शिव' याचे स्थानिक नाव आहे, व कोलाचल किंवा कोलचर्ल हे एक गाव आहे. यावरुन असे लक्षात येते की, कोलाचल किंवा कोलचर्ल हे गाव[३१] काडप्पा जिल्ह्यात किंवा त्याच्या जवळपास कुठेतरी वसलेले असावे.

परंपरेनुसार असे मानण्यात येते की, इ. स. च्या १४-१५ व्या शतकात हे गाव एका मोठ्या जमीनदारांच्या ताब्यात होते. तो जमीनदार उत्तरेकडून येणाऱ्या विद्वान पंडितांचा आदर सन्मान करीत होता. मल्लिनाथ सुद्धा त्याच जमीनदाराचे सभापंडीत होते.[३२] याउलट 'पेद्दुभट्टचरितम्' नुसार मल्लिनाथाचे निवासस्थान देवपूर होते.[३३]

पुण्यातील डेक्कन कॉलेजचे पंडित वामनाचार्य हे रघुवंश वगैरे महाकाव्याचे टीकाकार मल्लिनाथ काश्यप गोत्रीय ब्राह्मण आहेत असे मानतात तर धारवाड जिल्ह्यात गदगजवळ असणाऱ्या गजेन्द्रगडाला

त्यांचे निवासस्थान सांगतात. त्याठिकाणी आज त्यांचे वंशज राहतात. परंतु हे विधान अयोग्य अशा तथ्यांवर आधारित असल्याने संपूर्णपणे असत्य आहे.[३४]

मल्लिनाथाच्या वंशाचा संबंध नेहमीच कोणत्या ना कोणत्या तरी राजपरिवाराशी राहिला आहे. संजीवनी टीकाकार मल्लिनाथांचे आजोबा जे मल्लिनाथ आहेत त्यांचा मोठेपणा राजा वीररुद्राने सांगितला होता.[३५] संजीवनी टीकाकार मल्लिनाथांचा कनकाभिषेक सर्वज्ञसिंहभूपाल दुसरा यांने आपल्या 'षोडश यज्ञ' प्रसंगी केला होता.[३६] हे सिंहभूपाल राजकोण्डाच्या वेलम वंशातील पराक्रमी तसेच विद्वान राजा होते. यांचा राज्यकाळ १३८६ ते १४१२ असा आहे.[३७] विजयनगर सम्राट देवराय प्रथम याने सुद्धा मल्लिनाथाला आमंत्रित केले, आणि आपले सभापंडीत बनविले.[३८] याप्रकारे मल्लिनाथाचा पुत्र कुमारस्वामी सुद्धा देवराय द्वितीय याचा पुत्र मल्लिकार्जुन (१९४९) च्या सभेची शोभा वाढवित होता.[३९]

वर सांगितलेल्या प्रमाणांच्या आधारावर असे म्हणता येईल की, कोलाचल मल्लिनाथ सूरी यांचा जन्म कोलाचल गावात झाला आणि त्यांचे बालपण सुद्धा तेथेच गेले. नंतर (पेद्दुभट्टचरितम्‌चे वर्णन सत्य असेल तर) त्या वर्णनानुसार मल्लिनाथ काही वर्षे आपल्या सासुरवाडीत राहीले आणि तेथून अध्ययनासाठी काशी येथे गेले. काशीतून परत येऊन पुन्हा सासुरवाडीला जाऊन आपल्या स्वत:च्या गावी आले आणि तेथील जमीनदाराचे सभापंडित झाले. नंतर काही काळ त्यांनी सिंहभूपालच्या छत्रछायेखाली घालवून आपल्या मृत्यूपर्यंत विजयनगर सम्राट देवरायची राजधानी विजयनगर किंवा विद्यानगरमध्ये राहिले.[४०]

## १.३ मल्लिनाथाचा काळ :-

मल्लिनाथाने ज्या काही रचना केलेल्या आहेत त्या रचनांच्या अन्त:प्रमाण आणि बाह्य प्रमाणांच्या आधारावर चर्चा करुन त्याचा काळ निश्चित केला जावू शकतो. ती अन्त: आणि बाह्य प्रमाणे पुढीलप्रमाणे आहेत -

### (अ) अन्त:प्रमाण :-

मल्लिनाथाने आपल्या टीकेत आणि रचनेत अनेक विद्वान, लेखक तसेच त्यांच्या रचनेतील उद्धरणे सांगितली आहेत. मल्लिनाथाने कुमारसंभवातील, दुसऱ्या सर्गाच्या पहिल्या श्लोकातील संजीवनी टीकेत मुग्धबोधकार बोपदेवांना उद्धृत केले आहे.[४१] हे बोपदेव, यादव वंशातील राजा महादेव आणि त्यांचे उत्तराधिकारी रामचंद्र यांच्या काळातील होते. रामचंद्राने १२७१ पासून १३०९

पर्यंत राज्य केले होते. [४२] यावरून मल्लिनाथ, बोपदेवानंतरचे किंवा समान काळातील असावेत.

दुसरे असे की, मल्लिनाथाने संजीवनी टीकेत अनेक ठिकाणी 'संगीतरत्नाकर' या ग्रंथातील प्रमाणे दिली आहेत.[४३] या ग्रंथाची रचना यादवराजा सिंहन याच्या काळात झाली होती. त्याचा राज्यकाळ शक सं. ११३३ ते ११५० पर्यंत आहे.[४४] यावरुन स्पष्ट होते की मल्लिनाथ सिंहन नंतरच्या काळातील आहेत.

मल्लिनाथाने मेघदूत (पूर्वमेघ) श्लोक क्र.४६ च्या टीकेत एकावलीतील उद्धरण सांगितले आहे.[४५] शिवाय 'एकावली' वरील 'तरल' नावाची टीका सुद्धा प्रसिद्ध आहे. या एकावली ग्रंथात राजा वीरनरसिंह जो सिंहनचा समकालिन होता त्याचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेला आहे. वीरनरसिंह याने इ. स. १३१४ पर्यंत राज्य केले होते.[४६]

तसेच मल्लिनाथाने आपल्या टीकेत अनेक ठिकाणी 'मेदिनी' शब्दकोशातील परिच्छेद दिले आहेत. मेदिनी शब्दकोशाचा कर्ता मेदिनीकार यांचा काळ चौदावे शतक आहे. शिवाय मल्लिनाथाने टीकेत जेवढ्या व्यक्तींना तसेच त्यांच्या रचनांना उद्धृत केले आहे, त्या सर्वांमध्ये मेदिनीकाराचा उल्लेख शेवटी आहे.[४७] याप्रकारे निश्चितच मल्लिनाथ हे मेदिनीकारानंतरच्या काळातील किंवा त्यांच्या समकाळातील असावेत असे सिद्ध होते. वरील सर्व अन्त: पुराव्यांच्या आधारे हे सिद्ध होते की, मल्लिनाथांचा काळ चौदावे शतक आहे.

**ब) बाह्य प्रमाण :-**

मल्लिनाथांचा काळ निश्चित करण्यासाठी जी अनेक बाह्य प्रमाणे मिळालेली आहेत ती पुढीलप्रमाणे -

मल्लिनाथसुत कुमारस्वामी हे विजयनगर सम्राट देवराज द्वितीयचा पुत्र तसेच त्याचा उत्तराधिकारी जो राजा 'मल्लिकार्जुन'च्या राजसभेला विभूषित करीत होते. मल्लिकार्जुन १४४९ मध्ये सिंहासनावर बसले.[४८] यावरुन मल्लिनाथाचा काळ त्याच्यापूर्वीचा असावा.

वर जी प्रमाणे सांगितली आहेत त्या आधारावर निष्कर्ष काढण्यापूर्वी एका संशयाचे निराकरण होणे आवश्यक आहे. 'मालतीमाधव' नाटकातील सातव्या अंकाच्या जगद्धरकृत टीकेच्या आधारावर डॉ. भांडारकरांनी मल्लिनाथाला जगद्धरच्या आधीचे मानले आहे.[४९] जगद्धराने, मालतीमाधवच्या सातव्या अंकाच्या सुरुवातीला 'आ' उपसर्गपूर्वक 'प्रच्छ्' धातूचा अर्थ 'अनुमती मागणे' हे स्पष्ट केल्यानंतर म्हटले आहे की, हा धातू 'मेघदूत' मध्ये सुद्धा आला आहे आणि

टीकाकाराने तेथेही अशीच व्याख्या सांगितली आहे.[५०] जगद्धराने टीकाकार असा जो उल्लेख केला त्याचा भांडारकरांनी मल्लिनाथ टीकाकार असा अर्थ घेतला. यासंबंधी दिले गेलेले पुरावे सुद्धा शंकास्पद आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, जगद्धरने 'टीकाकृत' असा एकवचनी वापर केला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की त्यांना एकाच टीकाकाराविषयीची माहिती होती जो प्रसिद्ध आहे आणि त्याने त्या धातूचा तसाच अर्थ केला आहे.[५१] डॉ. अमरनाथ पाण्डेय यांचा असा विचार आहे की 'मालतीमाधव'च्या सातव्या अंकातील वर सांगितलेल्या जगद्धरकृत टीकेतील भागाला पाहून हे स्पष्ट होत नाही की, 'टीकाकृता' या पदाद्वारे जगद्धरांनी मल्लिनाथाकडे इशारा केला आहे. मेघदूतात 'आपृच्छस्व प्रियसखममुम्' इत्यादीच्या संजीवनी टीकेत[५२] 'आपृच्छस्व'ची व्याख्या जगद्धरने सांगितल्याप्रमाणे केलेली नाही. याठिकाणी आणखी एक विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे की, कालिदासाच्या 'मेघदूत'या काव्यावर जगद्धराच्या 'रसदीपिका' टीकेचा उल्लेख सुद्धा मिळतो.[५३]

याशिवाय आणखी काही प्रमाणे आहेत जी मल्लिनाथाचा काळ निश्चित करण्यास उपयोगी पडतात. ती अशी –

सिंहभूपालने (१३८६-१४१२) मल्लिनाथाचा 'कनकाभिषेक' आपल्या 'षोडश यज्ञ' च्या वेळी केला होता. यानंतर सम्राट देवराय पहिला याने (१४१०-१४२२) मल्लिनाथांना वैश्यासंबधी उत्पन्न झालेल्या वादावर निर्णय करण्यासाठी नियुक्त केले होते. देवराय दुसरा याच्या मृत्यूनंतर मल्लिकार्जुन सिंहासनावर बसले (१४४९) त्यावेळी मल्लिनाथसुत कुमारस्वामी त्यांच्या राजसभेत राहू लागले.

कोणत्याही सर्वसामान्य विद्वानाचा कनकाभिषेक होणे की गोष्ट अशक्यप्राय आहे. यावरुन सिद्ध होते की जवळजवळ इ. स. १४१० मध्ये मल्लिनाथ मोठ्या विद्वानाच्या रुपात दूरपर्यंत प्रसिद्ध झाले असावेत. सिंहभूपालने मल्लिनाथाचा कनकाभिषेक केल्यामुळे देवराय प्रथमाला वैश्यांसंबधी वाद उत्पन्न झाला असता त्यावर निर्णय देण्यासाठी मल्लिनाथाची निवड करण्यात सहजता प्राप्त झाली असावी. याचे फळ म्हणून देवराय पहिला आणि देवराय दुसरा यांच्या राजसभेत ते आले आणि आपल्या जीवनातील शेवटचे काही दिवस तेथेच राहिले. कारण नंतर त्यांच्याजागी त्यांचे पुत्र 'कुमारस्वामी' प्रतिष्ठित झाले.

अशाप्रकारे वर उल्लेख केलेल्या अन्त: तसेच बाह्य ठोस प्रमाणांचे योग्य प्रकारे विवेचन केल्यानंतर आपण या निष्कर्षापर्यंत पोहोचतो की टीकाकार कोलाचल मल्लिनाथ सूरी यांचा काळ चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पंधराव्या शतकाच्या मध्यापर्यंत आहे. अशाप्रकारे टीकाकार मल्लिनाथाचा काळ प्राय: इ. स. १३५० ते १४५० पर्यंत निश्चित होतो.

## १.४ मल्लिनाथाची ग्रंथसंपदा :-

### अ) मौलिक रचना :-

कोलाचल मल्लिनाथ सूरींनी संजीवनी टीकेच्या सुरुवातीलाच स्वत:साठी 'कवि' हे पद उपयोजिले आहे. (मल्लिनाथकवि:सोऽयं) टीकाकार मल्लिनाथ सूरी हे उच्चकोटीचे विद्वान होते. शिवाय ते चांगले कवी होते. यांच्या नावावर अनेक कृतींचा उल्लेख मिळतो - 'उदारकाव्य'[५४], 'रघुवीर चरितकाव्य', 'वैद्यकल्पतरु', 'वैद्यरत्नमाला', 'वैश्यवंशसुधार्णव' आणि 'नक्षत्रपात'. यातील पहिल्या चार कृतींचा उल्लेख एम. आर. काळे यांनी सुद्धा केला आहे.[५५] त्याच्या ग्रंथाचा थोडक्यात परिचय पुढीलप्रमाणे -

संपूर्ण 'रघुवीरचरितम्' हे महाकाव्य सतरा सर्गात आहे. या महाकाव्यामध्ये श्रीरामचंद्राच्या वनवासापासून राज्याभिषेकापर्यंच्या कथेचे वर्णन आले आहे. कालिदासाच्या रघुवंशाचा यांवर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. रघुवीरचरिताच्या सतराव्या सर्गावर रघुवंशातील तेराव्या सर्गाचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. टी. गणपतिशास्त्रींनी संपादित केलेल्या 'रघुवीरचरितम्'यात एकूण १५३१ श्लोक आहेत. आकाराने जवळजवळ हे रघुवंशाइतकेच मोठे आहे. (रघुवंश - १५६९ श्लोक).

मल्लिनाथाची दुसरी कृती म्हणजे 'वैश्यवंशसुधार्णव' ही होय. विजयनगर सम्राट देवराय पहिला (१४००-१४२२) याने वैश्यांच्या संबधी वाद उत्पन्न झाला असता त्यावर निर्णय देण्यासाठी मल्लिनाथाची नियुक्ती केली होती. तोच निर्णय म्हणजे 'वैश्यवंशसुधार्णव' होय. विजयनगरच्या तत्कालिन अर्थव्यवस्थेच्या संदर्भात हा 'वैश्यवंशसुधार्णव' ग्रंथ खूपच महत्त्वपूर्ण ठरला असावा.

मद्रासमधील राजकीय प्राच्य ग्रंथालयात ज्योतिषशास्त्र ग्रंथाची 'नक्षत्रपात' नावाच्या दुसऱ्या अध्यायाची एक मूळ प्रत मिळाली.[५६] त्याच्या कर्त्याचे नाव कोलाचल मल्लिनाथ आहे.[५७] पदयोजनाकार नारायणानुसार त्यांचे पूर्वज टीकाकार मल्लिनाथ यांनी ज्योतिषावर सुद्धा काम केले होते. यावरून वर सांगितलेल्या ज्योतिष ग्रंथाचा कर्ता मल्लिनाथ असावा असे समजते. कदाचित

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

संजीवनी टीकाकार मल्लिनाथांहून जे भिन्न मल्लिनाथ आहे. त्यांची ही कृती असण्याची शक्यता आहे.[५८] परंतु जास्ती-जास्त शक्यता संजीवनी टीकाकार कोलाचल मल्लिनाथ सूरी ची ही कृती असावी अशी आहे. थोडक्यात असे की 'कोलाचलमल्लिनाथसूरी' नी विद्येची अनेक क्षेत्रे आपल्या ज्ञानाने कृतार्थ करुन आपल्या वंशाची किर्ती वाढवली.

**ब) टीका** – 'कोलाचलमल्लिनाथसूरी' हे संस्कृत साहित्यातील महान टीकाकाराच्या रुपात प्रसिद्ध आहेत. त्यांनी केलेल्या खालील टीका प्राप्त हातात –

| | ग्रंथाचे नाव | | मल्लिनाथकृतटीकेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | रघुवंश | कालिदासकृत | सञ्जीवनी |
| २. | कुमारसम्भव | कालिदासकृत | सञ्जीवनी |
| ३. | मेघदूत | कालिदासकृत | सञ्जीवनी |
| ४. | किरातार्जुनीय | भारविकृत | घण्टापथ |
| ५. | शिशुपालवध | माघकृत | सर्वङ्कषा |
| ६. | नैषधीयचरित | श्रीहर्षकृत | जीवातु |
| ७. | भट्टिकाव्य | भट्टिकृत | सर्वपंथीना |
| ८. | एकावली | विद्याधरकृत | तरल[५९] |
| ९. | तार्किकरक्षा | | निष्कण्टिका |
| १०. | तन्त्रवार्तिक | | सिद्धाञ्जन |
| ११. | स्वर (मनोज्ञ) मञ्जरी | | परिमल |
| १२. | प्रशस्तपादभाष्य | | ? |

'तन्त्रवार्तिक' टीकेचा उल्लेख स्वत: मल्लिनाथाने एकावली वर केलेल्या 'तरल' टीकेत केला आहे.[६०] मल्लिनाथसुत 'कुमारस्वामी'ने सुद्धा 'प्रतापरुदीय' च्या 'रत्नापण' टीकेत 'तरल' तसेच 'सिद्धाञ्जन' टीकेचा उल्लेख केला आहे.[६१] तसेच स्वत: मल्लिनाथाने स्वर (मनोज्ञ) मञ्जरी वरील 'परिमल' टीकेचा उल्लेख एकावलीवर केलेल्या तरला टीकेत केला आहे.[६२] प्रशस्तपादभाष्य टीकेचा उल्लेख मल्लिनाथाने तार्किकरक्षाच्या निष्कण्टिका टीकेत केला आहे.[६३] मल्लिनाथाने केलेल्या या टीकांव्यतिरिक्त अनेक टीका त्यांच्या नावाशी जोडलेले आहेत. अशाप्रकारे 'कोलाचल मल्लिनाथ सूरी' यांनी विपुल ग्रंथ रचना करुन संस्कृत साहित्यात मौलाची भर घातली आहे.

# संदर्भ सूची

१. वामन झळकीकर : काव्यप्रकाश पुणे, १९६५, प्रस्तावना, पृ. २३.

२. S. C. Banerjee : Commentaries of Mallinatha (S. K. De Memorial Volume, P. 300).

३. K. P. Trivedi : Ekavali of Vidyadhar, 1903, Introduction.

४. S. C. Banerjee : Commentaries of Mallinatha (S. K. De Memorial Volume, P. 300).

५. M. Krishnamacharirar : History of Classical Sanskrit Literature, Reprint, 1970, P. 732 & 816.

६. Dr. A. Krishnaswami : The Tamil country under vi-jaynagar, 1964.

७. Ibid, P. 84.

८. K. A. Nilkantha Shastri - A History of South India, Oxford University Press, 1966, Page 244.

९. Ibid. Page 352.

१०. N. Venkataramanayy - Vijayanagar : Origin of City and Empire, Madras 1933, P.145.

११. Ibid. Page 181.

१२. बल्लाळसेन – भोजप्रबंध, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९१७ पृ. ४९.

१३. तत्रैव, पृ. ७२–७३.

१४. तत्रैव, पृ. ७८–७९.

१५. S. C. Banerji : A companion to Sanskrit Literature, Motilal Bonarsidas, I971, I05.

१६. वामन शिवराम आपटे – संस्कृत–हिंदी कोश, पान क्र.११२०.

१७. 'धीमान् सुरि: कृतीकृष्टिर्लबध्वर्णी विचक्षण: ।' अमरकोश, २.७.६ / तथा
Monir Williams - A Sanskrit - English - Dictionary, P. I243.

१८. 'अयवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन्पूर्वसुरिभि:' – रघुवंश, १.४
'तत्र सूनृतगिरश्च सूरय:' – शिशुपालपबध, १४.२१.

१९. व्ही. राघवन् (संपा.) प्रतापरुद्रीय, मद्रास, १९७०, पृ. १

२०. के. पी. त्रिवेदी (संपा) प्रतापरुद्रयशोभूषणम्, निर्णयसागर मुद्रणालय, मुंबई, १९०९ प्रस्तावना.

२१. Dr. P. Sri Ramamurti : Contribution of Andhra to Sanskrit Literature, 1972, P. 109.

२२. Ibid. P. 110.

२३. Dr. V. Raghavan : New Indian Antiquary II, p. 448, f. n. 1.

२४. प्रकाशक : मानस-सङ्घ, रामवन, जिला - सतना (म. प्र.), प्रथम संस्करण, १९६६

२५. अन्तिम पुष्पिका - 'श्रीशाके १५३० किलकनामसम्वत्सरे दक्षिणायने श्रावणे मासे शुक्लपक्षे सप्तम्या तिथौ जनार्दनसूनुना गोविन्दशरणलिखितमिद पुस्तकं मेघदूतटीकाख्यं स्वार्थ परार्थ चेति। ।श्री।।।श्री।।।श्री।।।श्रीः।। ।शुभम्।।'

२६. डॉ. रामेश्वरप्रसाद मिश्र - मेघदूतम् (पञ्जरिकाविभूषिनम्), सतना १९६६, प्रस्तावना, पृ.११-१२.

२७ आचार्य बलदेव उपाध्याय : 'सायण आणि माधय' वि. सं. २००४, पृ.२१.

२८. Dr. P. Sri Ramamurti : Contribution of Andhara to Sanskrit Literature, 1972, P. 112.

२९. K. P. Trivedi : Ekavali of Vidyadhar, Bombay 1903, Introduction.

३०. Dr. P. Sri Rammaurti : Contribution of Andhara to Sanskrit Literature, 1972, P. 110

३१. K. P. Trivedi : Ekalvali of Vidyadhar, Bombay, 1903, Introduction\

३२. Ibid.

३३. S. C. Banerjee : Commentaries of Mallinatha (S. K. De Memorial Volume, P. 300).

३४. G. R. Nandargikar : Raghuvamsa of Kalidasa, 1971, Preface, P. 4.

३५. पं. बलदेव उपाध्याय - सायण आणि माधव, सं.२००३, वि. पृ. २१.

३६. M. Krishnamachariar : History of Classical Sanskrit Literature, 1970,P.I20.

३७. Dr. P. Sri Rammaurti : Contribution of Andhara to Sanskrit Literature, 1972, P. 80.

३८. N. Venkataramanayya : Vijayanagara : Orign of City and Empire, P. 184.

३९. श्री. प्रभातशास्त्री, सम्पादक – चन्द्रकलानाटिका, १९७३, प्रस्तावना, पृ.५

४०. मल्लिनाथाने आपल्या 'वैश्यवंशसुधार्णव' मध्ये विजयनगरला 'विद्यानगर' लिहिले आहे – 'विद्यानगरधर्मासनप्रकारोऽयम्।'

४१. 'मुग्धबोधकारस्तु–सुराशब्दष्टावन्त इत्याचष्टे।'

४२. M. Krishnamachariar : History of Classical Sanskrit Lit., 1970, P. 120.

४३. 'स्वराणां स्थापना: सान्तामूर्च्छना: सप्त सप्त हि, इति संगीतरत्नाकरे' उ. मे. पान. ९३, ओळ. १७, १८.

४४. M. Krishnamachariar : History of Classical Sanskrit Lit., 1970, P. 120.

४५. 'तदुक्तमेकावल्याम् – 'यंदवाच्यस्यवचनंमावाच्यवचनं हि तत्' इति।' पान. ४९

४६. M. Krishnamachariar : History of Classical Sanskrit Lit., 1970, P. 120.

४७. S. C. Banerjee : Commentaries of Mallinatha (S. K. De Memorial Volume, P. 300). Medini is quoted by Malli. in Sisupalvadha, II, 65 and XIV. 29, also at about forty places in Naisadha.

४८. श्री. प्रभातशास्त्री, सम्पादक – चन्द्रकलानाटिका, १९७३,भूमिका.

४९. G. R. Nandargikar : Raghuvamsa of Kalidasa, 1971, Preface, P.1.

५० मंगेशरामकृष्ण तैलङ्ग – मालती–माधव, निर्णयसागर, १९३६ जगद्धरकृतटीका, पृ.८५.

५१. G. R. Nandargikar : Raghuvamsa of Kalidasa, 1971, Preface, P.1-2.

५२. "आपृच्छस्व 'साधो। यामि' इत्यामन्त्रेण सीजय । 'आमन्त्रणसभाजने आप्रच्छन्नम्' इत्यमर:। 'आङिनुप्रच्छ्योरुपसंख्यानम् (वा.९०९) इत्यादत्मनेपदम्।"
– नारायणराम आचार्य – मेघदूतम्, निर्णयसागर, १९५३, पृ. ९.

५३. S. K. De : Some Commentators on Meghadoot (Our Heritage, Vol. II, 1955, P. 18-19.) Also G. R. Nandargikar : Raghuvamsa of Kalidasa, 1971, Preface, I.3.

५४. "Udarakavya was probably mistaken for Udararaghava of Kavimallamalla (Sakalyamalla, a contemporary of Singhabhupala of 14th A. D.) who was a different poet." M. Krishnamachariar : History of Classical Sanskrit Lit., 1970, P. 121, footnote.

तथा, आचार्य बलदेव उपाध्याय – संस्कृत साहित्य का इतिहास – १, १९७३, पृ.३०५.

५५. M. R. Kale : the Kumarasambhava of Kalidas, Introduction, p. xxxI.

५६. Madras Triennial Catalogue, R. No. 2387(b).

५७. "इति कोलाचलमल्लिनाथविरचितायां (?) नक्षत्रपाताघ्यायो द्वितीय: ।"
New Indian Antiquary,Vol. II. P. 443.

५८. Ibid.

५९. डॉ. सुरेशचन्द्र बॅनर्जीनी आपला लेखात "Commentaries of Mallinatha" (S. K. De Memorial Volume, p. 301) तरल का अर्थ 'द्रव' (Liquid) केला आहे. मल्लिनाथ ने आपल्या सर्व टीकाचे नामकरण साभिप्रात केला आहे. अत: डॉ. बॅनर्जीनी केलेला अर्थ उचित नाही । एकावली सापेक्ष्य तरला चा अर्थ मध्यमणि (Central-gem) होईल.

६०. "तदैतत् सम्यक् विवेचितमस्मामि: तन्त्रवार्तिक्वाजपेयाधिकरणे ।" K. P. Trivedi : Ekavali of Vidyadhar, Bombay, 1903, p. 152.

६१. "तदुक्तंातपादैरेकावलीतरले तन्त्रवार्तिकव्याख्याने सिद्धाञ्जने च– 'स्वार्थत्यागे समानेऽपि सहतेनान्यलक्षणा । यत्रेयमजहत्स्वार्था तु तं विना' ।।" V. Raghavan : Prataparudriyam, 1970, p. 34

६२. "तदैतत् सम्यक प्रपश्चितमस्यामि: स्वरमञ्जरीपरिमलटीकायाम् ।" K. P. Trivedi : Ekavali of Vidyadhar, Tarala Tika, 1903, p. 59.

६३. i) दिक्कालसाधनप्रपञ्चस्तु अस्मत्प्रणीतप्रशस्तपादभाष्यटीकायां द्रष्टव्य:; ।"

ii) Nilakantha Shastri - History of South India, 1966, P. 346.

-----x----